# प्रसिध्दीपत्रक

## सन २०१९ ची पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रियेबाबत.

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावर बुध्दीवान उमेदवारांची निवड होण्याची आवश्यकता, पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणी दरम्यान होणाऱ्या दुर्घटना या बाबी विचारात घेवुन शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दिनांक १८/०१/२०१९, अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नवीन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परीक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलविण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रिया दिर्घकाळ सुरु न राहाता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे जिल्हयाबाहेरील उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत राहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चितच होईल.

( लोहित मतानी )
अपर पोलीस अधीक्षक, जळगाव

**ठिकाण :- जळगाव**
**दिनांक :- २६/०२/२०१९**